'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक
Vol. 2 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# मा. जोतीराव फुलेंच्या धर्मविषयक विचारांची दिशा.

**प्रा. प्रमोद विश्वनाथ खोंड**
सहकार विद्या मंदीर व क. म. वि.जळगांव (जामोद)
जिल्हा - बुलडाणा
महाराष्ट्र, भारत

**प्रा. अभिजीत नाना पाटील**
विद्याभारती महाविद्यालय, सेलू
जिल्हा - वर्धा
महाराष्ट्र, भारत

*जोतीरावांचा सत्यधर्म सुधारणेपुरता मर्यादीत नव्हता त्यांना समाजाची पुनर्मांडणी करायची होती. त्यासाठी त्यांनी चातुवर्ण नाकारले. देवाच्या नावाखाली चालणाऱ्या पोटार्थी चालीरीतींना नकार दिला. सामाजिक न्यायाची ओढ व अन्यायाची प्रचंड चीड हेच त्यांच्या सत्यधर्माचे ब्रीद होते. समतेवर आधारीत नवा समाज त्यांना घडवायचा होता. जीवनातील सत्य म्हणजेच त्यांचा निर्मिक अथवा ईश्वर होय. निर्मिक म्हणजे सृष्टी व जिवांची निर्मिती करतो तो. हे कोण निर्माण करतो? असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो. त्याचे उत्तर पंचमहाभूते असे आहे. त्या दृष्टीने सार्वजनिक सत्यधर्म हा विज्ञाननिष्ठ आहे.*

महात्मा फुले म्हणजे एकोणीसाव्या शतकात सामाजिक क्रांती घडवून आणणारे अग्रदूत, हा विचार आता सर्वमान्य झाला आहे. 'ज्ञान ही एक शक्ती असून', सामाजिक परिवर्तनाचे महत्वाचे साधन आहे, ही फुल्यांची जीवननिष्ठा होती. त्यांचे समग्र धर्मविषयक विचार हे सत्यनिष्ठा, बुध्दीप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य या संकल्पनांवर आधारीत होते. त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या धर्मसंकल्पनेवर आहे.

फुल्यांनी इंग्रजी सत्तेचे केलेले समर्थन व ब्राम्हणशाहीवर ओढलेले कोरडे यांची दखल त्यांच्या धर्मविषयक विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. फुल्यांनी इंग्रजी सत्तेचे समर्थन केले खरे, पण तो काळ पेशवाई संपल्यानंतरचा होता हे लक्षात घ्यावे लागते. मराठी सत्तचे अस्तानंतरच्या काळाचा थोडा सविस्तर विचार केला असता, हे सिध्द होते की, त्या काळातील सर्वसामान्य लोकांनाही इंग्रजी सत्ता ही रामराज्यापेक्षा कमी वाटत नव्हती. याला कारण पेशवाईतील ब्राम्हणशाही व त्यामुळे त्रस्त झालेली सर्वसामान्य जनता हे आहे. त्यांनी इंग्रजी सत्तेचे समर्थन केले त्यामागे आणखी एक विचार होता, तो म्हणजे स्वातंत्र्य मिळाले तरी ते मुठभर लोकांच्या हाती जाईल. सामान्य माणसाची गुलामी तशीच कायम राहील हा विचार त्यामागे होता. त्याकाळातील न्या.रानडे, न्या.तेलंग आदींनीही इंग्रजी राज्याचे समर्थन केले आहे.

फुल्यांनी ब्राम्हणशाहीवर जोरदार टीका केली म्हणून ते ब्राम्हणांचे विरोधक होते, असा आरोप त्यांच्यावर केला जातो. हा आरोपही सत्य नाही कारण ते ब्राम्हणांचे नाही, तर ब्राम्हण्यावादाचे विरोधक होते. तसेच त्यांच्या समर्थकांत ब्राम्हणांची संख्या जास्त होती, हे सर्वज्ञात आहे. त्यांनी मुलींची जी पहिली शाळा सुरु केली ती भिडे या ब्राम्हण व्यक्तिच्या वाड्यात हे उदाहरण अतिशय बोलके आहे. तसेच त्यांनी ब्राम्हण विधवांच्या केशवपणाचा विरोध करण्यासाठी न्हाव्यांचा संप घडवुन आणला होता. ही उदाहरणे त्यांना ब्राम्हण विरोधक म्हणणारांसाठी पुरेशी आहेत.

जोतीरावांच्या धर्मविषय विचारांचा परामर्श घेतांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विचार करणेही आवश्यक आहे. ते सत्यनिष्ठ, बुध्दीप्रामाण्यवादी व कृतिप्रवण होते. 'बोले तैसा चाले'हा विचार त्यांच्या बाबतीत तंतोतंत खरा ठरतो. फुल्यांच्या व्यक्तिमत्वावर थॉमस पेन यांचा व त्यांच्या राईटस ऑफ मॅन या ग्रंथाचा प्रभाव होता. थॉमस पेन हा व्यक्तिस्वातंत्र्याचा अत्यंत प्रभावी पुरस्कर्ता होता. मानवी हक्क व व्यक्तिस्वातंत्र्य या दोन्ही प्रेरणा थॉमस पेन कडुन फुल्यांनी घेतल्या. त्यामुळेच त्यांच्या धर्मविषयक विचारांवर व्यक्तिस्वातंत्र्य या संकल्पनेचा प्रभाव दिसतो.

**पर्यायी धर्मकल्पनेची आवश्यकता का?**

तत्कालीन समाजात आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक सत्ता ज्या उच्च वर्णाच्या हाती एकवटली होती त्यांनी सामान्य लोकांना गुलाम करण्यासाठी धार्मिक व्युहरचना तयार केली होती. यातुन जनसामान्यांना मुक्त करण्यासाठी फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा मार्ग स्वीकारला. अर्थातच त्यासाठी त्यांना परंपरागत धर्मावर व चालीरीतवर टीका करावी लागली. ''चालत

आलेल्या धर्मावर प्रहार करुन ते सारे साध्य होणारे नव्हते, तर पर्यायी धर्मकल्पनाच देणे त्यासाठी नित्यांत आवश्यक होते''[१] हा भास्कर लक्ष्मण भोळे यांचा अभिप्राय योग्य वाटतो. परंपरांगत धर्माने जनसामान्यांची जी दैवशरण, प्रवाहपतीत आणि अगतिक मानसिकता घडवीली होती ती बदलणे. तसेच ज्या भाकड भयंकर दंतकथा तयार केल्या होत्या त्या साधार मोडीत काढणे असेही ध्येय होतेच.

या पार्श्वभूमिवर त्यांनी बुध्दीप्रामाण्याचा प्रभावी पुरस्कार केला आहे. धार्मिक,सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवुन आणणे या हेतूने प्रेरीत होवून त्यांनी नवी धर्मकल्पना मांडली. याचा अर्थ त्यांचा हिंदू धर्मावर विश्वास नव्हता, ते नास्तिक होते असा नाही. ते आस्तिकच होते. ''सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी दर रविवारी संध्याकाळी नियमितपणे जमुन ईश्वरोपासना करण्याचा उपक्रम त्यांनी सुरु केला होता. अंध्दश्रध्दावर ते जेवढे तुटून पडत तेवढाच नास्तीकपणाचा व पाखंडीपणा यांचाही निषेध केला होता''[२] ते सर्वच धर्मांचा आदर करीत असत. मात्र धर्माच्या नावाखाली होणारी पिळवणूक त्यांना मान्य नव्हती.

**एकेश्वरवादाचा पुरस्कार**

सृष्टीचा निर्माता, पोशींदा व नियंता असलेला निर्मिक एकच असुन संपूर्ण मानवजात म्हणजे त्याची लेकरे आहेत. ईश्वर हा एकच आहे असे फुले मानत असत. निर्मिक सत्यस्वरुपी व तेजस्वी आहे. तेव्हा त्याची भेट घेण्यासाठी अथवा त्याला प्रत्यक्ष पाहण्यासाठी केले जाणारे प्रयत्न निरर्थक आहेत, असा त्यांचा अभिप्राय होता. मानवाने सृष्टीव्यापारातून व्यक्त होणाऱ्या निर्मात्याच्या इच्छा जाणून घ्याव्यात. अतिशय कृतज्ञतापूर्वक त्याचे स्मरण करावे. अनन्यभावे शरण जावे. कोणतेही कर्मकांड, मूर्तीपूजा, अवतारकल्पना, जप-तप, अनुष्ठान, नैवद्य वगैरेची त्यांच्या निर्मिकास गरज नाही. किंबहूना माणुस व इश्वर यांच्यात कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. त्यामुळेच त्या काळातील गोरगरीबांची लूबाडणुक करणाऱ्या पोटार्थीची त्यांनी चांगलीच पोलखाल केली होती. बहुजनसमाज ज्यांना दैवते मानते त्यांना फुले बळीच्या राज्यातील कर्तुत्वान व्यक्ती मानत असत. ''जोतीरावानी संकल्पलेला निर्मिक चिटवादी किंवा चैतन्यवाद्यांच्या परमेश्वरापेक्षा नामभिन्नतेमुळे नव्हे, तर सर्वदृष्टींनी वेगळा आहे''[३] हा मे.पु.रेगे यांचा अभिप्राय योग्य आहे. सृष्टीचे पालनपोषण करणारा तीचे सुयोजन, संतुलन करणारा अशी प्रयोजनवादी भूमिका ते निर्मिकाच्या बाबतीत घेतात. त्यामुळे साहजिकच पुर्नजन्माचे चक्र, कर्मविषयक सिध्दांताला कुठेही महत्व उरत नाही. सद्विवेक व सत्यमार्ग ही त्यांच्या निर्मिकाला प्रिय आहे. अशी त्यांची एकेश्वरवादी भूमिका आहे.

जोतीरावांच्या एकेश्वर संकल्पनेवर बुध्दीप्रामाण्याचा प्रभाव आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास. या पृथ्वीच्या 'पृष्ठभागावर जेवढी म्हणून धर्मपुस्तके आहेत. त्यापैकी एकाही धर्मग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सारखे सार्वजनीक सत्य नाही कारण धर्मपुस्तकामध्ये काही व्यक्तिंनी त्यावेळेच्या प्रसंगास अनुसरुन हेकडपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवप्राण्यास सारखे हितकारक न होता. सहजच त्यामध्ये अनेक फळया होवून त्या एकमेकांचा मनापासून हेवा व व्देष करु लागतात' म्हणजेच कोणत्याही धर्मग्रंथातील सत्य हे माणसाच्या सद्विवेक बुध्दीने तपासून पहावे. माणसाची धारणा करतो तोच खरा धर्म असा त्यांचा विश्वास होता.

**सत्यनिष्ठ, बुध्दीप्रामाण्यवादी धर्म**

जोतीरावांचा सत्यधर्म सुधारणेपुरता मर्यादीत नव्हता त्यांना समाजाची पुनर्मांडणी करायची होती. त्यासाठी त्यांनी चातुवर्ण नाकारले. देवाच्या नावाखाली चालणाऱ्या पोटार्थी चालीरीतींना नकार दिला. सामाजिक न्यायाची ओढ व अन्यायाची प्रचंड चीड हेच त्यांच्या सत्यधर्माचे ब्रीद होते. समतेवर आधारीत नवा समाज त्यांना घडवायचा होता. जीवनातील सत्य म्हणजेच त्यांचा निर्मिक अथवा ईश्वर होय. निर्मिक म्हणजे सृष्टी व जिवांची निर्मिती करतो तो. हे कोण निर्माण करतो? असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो. त्याचे उत्तर पंचमहाभूते असे आहे. त्या दृष्टीने सार्वजनिक सत्यधर्म हा विज्ञाननिष्ठ आहे. सूर्य पूर्वेलाच उगवतो हे सार्वजनिक सत्य आहे. सत्य हे जात, धर्म, देश या पलीकडे असते. म्हणूनच धर्माने माणसाला सत्य सांगावे

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

असा त्यांचा आग्रह होता. कोणत्याही समाजाची प्रगती ही सामाजिक नियमांनुसार होते. समाजाचे अस्तित्व हे त्यांच्या श्रध्दा व विश्वासावरुन ठरते. धर्म लोकांच्या श्रध्दा व विश्वास नियमित करतो. शोषीत, पिडीत,उपेक्षीत लोकांचा विकास हेच धर्माचे ध्येय असले पाहीजे. संपूर्ण मानवमात्रासाठी एकच एक असलेला सार्वजनिक सत्यधर्म आचरणारा समाज हे त्यांचे अंतीम ध्येय होते. या बाबत बा.ह.कल्याणकर म्हणतात माणूस हाच माणसाची मोजपट्टी आहे. ''माणूस हेच या पृथ्वीवरील जीवणाचे मूल्य आहे. हेच सूत्र त्यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचे मुख्य सूत्र आहे''[४] अर्थात माणुस व माणुसपण हेच धर्माचे सार होय.

फुल्यांचे कार्य हे महार, मांग, गारुडी अशा बहूजन समाजासाठी होते. त्यामुळेच त्यांचे धर्मविषय विचारही समतावादी आहेत. माणसाच्या विवेकबुध्दीला रुचेल,पचेल एवढाच धर्माचा अवाका असावा. धर्म हा माणसाच्या कल्याणासाठी आहे. माणसाचा धर्माच्या कल्याणासाठी गैरवापर होवू नये. निर्मिक अथवा ईश्वर एक असून सत्य हेच त्याचे मूल्य आहे. धर्माचरणासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. सर्व मानव जात ही निर्मिकाची लेकरे आहे. त्यामुळे जप-तप, नवस, उपवास हे निरर्थक आहेत. हेच त्यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचे सार आहे.

**संदर्भ टीपा**

१. मासिक लोकराज्य, म.जोतीराव फुले विशेषांक ९१, पृष्ठ क्रमांक १५
२. गं.बा.सरदार, महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, १०५,०६
३. मे.पु.रेगे, महात्मा फुले गौरव ग्रंथ ५७३
४. मासिक लोकराज्य, म.जोतीराव फुले विशेषांक ९१, पृष्ठ क्रमांक ११४